ePaper

## म्हणून शिवसेना शरद पवारांची सदैव आभारी राहील": उद्धव ठाकरें



| वर्ष - 6 | अंक - 185 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com |सोमवार|दिनांक 17ऑक्टोबर2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**

- 'जसं बोलले तसंच केलं'; 'पुणे बदलतंय'
- शिक्षण सेवकांचा महापालिका भवनात आनंदोत्सव
- भाजपवर दबाव वाढला!



# चोरट्यांवर 'करडीनजर'!

## पोलीस प्रशासन सतर्क : गस्ती पथके नियुक्त करणार

**|पिंपरी-चिंचवड |**
**| महाईन्यूज | प्रतिनिधी|**

**दिवाळीच्या सुट्यांमध्ये एमआयडीसीत चोरी व गुन्हेगारीचे प्रकार घडतात. ते टाळण्यासाठी पोलिसांची विशेष गस्ती पथके नियुक्त करण्यात येणार आहेत, तसेच उद्योजकांचीही त्यासाठी मदत घेण्यात येणार आहे. पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांनी याबाबतचे आदेश दिले आहेत.**





दिवाळीनिमित्त औद्योगिक आस्थापनांकडून सुटी जाहीर केले जाते. त्यानुसार यंदा २२ ते २७ आक्टोबर या कालावधीत कंपन्यांमधील कामकाज बंद राहणार आहे. त्यामुळे एमआयडीसीत चोरी व गुन्हेगारीचे प्रकार घडतात. कंपन्यांमधून स्क्रॅप, मशीन, कच्चा माल, वाहने तसेच इतर साहित्य, वस्तू चोरून नेल्या जातात. त्यामुळे कंपन्यांना मोठ्या नुकसानीला सामोरे जावे लागते.

सुटीच्या कालावधीत एमआयडीसीतील सुरक्षेसाठी उद्योजकांची मदत घेण्यात येणार आहे. गस्तीसाठी कंपन्यांकडून वाहने, खासगी सुरक्षारक्षक घेण्यात येणार आहेत. तसेच पोलीस मित्र, स्वयंसेवक यांचाही या पथकांमध्ये समावेश राहणार आहे. उद्योजकांनी कंपन्यांच्या परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. तसेच सुरक्षारक्षकदेखील नियुक्त करावेत. सुरक्षा भिंतीच्या दुरुस्तीसह 'अलार्म बसवणे, अशा सूचना उद्योजकांना करण्यात येत आहेत.

> दिवाळीच्या सुटीमध्ये एमआयडीसीत शुकशुकाट असतो. त्याचा गैरफायदा घेत चोरी, गुन्हेगारी कृत्य केले जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे एमआयडीसीत रात्री आणि दिवसाही गस्त घालण्यात येणार आहे. यासाठी विशेष पथके राहणार आहेत. उद्योजकांशी संवाद साधून त्यांच्या अपेक्षा, अडचणी समजून घेण्यात येऊन त्यांच्या मदतीने आणखी उपाययोजना करण्यात येतील.
>
> **– अंकुश शिंदे,**
> **पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय.**

पिंपरी, चिंचवड, भोसरी, हिंजवडी, तळवडे, चाकण, तळेगाव येथील उद्योजकांशी पोलिसांकडून संवाद साधण्यात येणार आहे. त्यासाठी पोलीस उपायुक्त बैठक घेणार आहेत. विभागानुसार या बैठका होणार आहेत. पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयांतर्गत दोन परिमंडळ आहेत. एका परिमंडळात गस्तीसाठी चार पथके नियुक्त करण्यात येणार आहेत. या प्रत्येक पथकात एक अधिकारी आणि चार कर्मचारी, असे पाच पोलीस राहणार आहेत.

# खाद्य पदार्थ्यांच्या गुणवत्तेवर विशेष भर द्यावा !

## डॉ. भारती चव्हाण : कलादर्पण महिला हस्तकला प्रदर्शन

**| पिंपरी |**
**| महाईन्यूज | प्रतिनिधी|**

दिवाळी सणानिमित्त प्रतिभा महाविद्यालयाच्या महिला कल्याण समितीच्या वतीने एक दिवसीय कलादर्पण महिलाच्या हस्तकलेचे प्रदर्शन व विक्री हा उपक्रम महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थीनी व पालक यांच्या संयुक्त सहभागातून राबविण्यात आला, त्यात घरगुती फराळ, वस्तू, आकाश कंदील आदींचा समावेश होता. याचे उद्घाटन मानीनी फाऊंडेशनच्या अध्यक्षा डॉ. भारती चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी डॉ. भारती चव्हाण मार्गदर्शन करताना म्हणाल्या, कमला शिक्षण संकुलाचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा यांच्या नेतृत्वाखाली अल्पवधीतच पिंपरी चिंचवड शहरात उत्कृष्ठ व्यवस्थापन व प्राध्यापकांचे विद्यार्थ्यांना शैक्षणिक मार्गदर्शनामुळे संस्था नावारूपाला आली आहे, ही कौतुकास्पद बाब आहे. त्यातच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, भावी आदर्श नागरिक घडावा, यादृष्टीने विद्यार्थी दशेतच स्वयंरोजगार खेळ, कला, नाट्य क्षेत्रातही महाविद्यालय प्रगती पथावर आहे. आज समाजपयोगी विद्यार्थी उपयोगी उपक्रमाद्वारे विद्यार्थी, पालकांनी बनविलेल्या घरगुती उत्पादनाला बाजारपेठ उपलब्ध करून दिली आहे. वस्तू निर्मितीच्या गुणवत्तेवर विशेष भर द्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यावेळी डॉ. भारती चव्हाण यांच्याहस्ते पुरूषोत्तम करंडक स्पर्धेत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या स्पर्श नॉट रिचेबल एकांकिकामध्ये पंडीत सत्यदेव दुबे स्मृती सर्वोत्कृष्ट विद्यार्थी प्रायोगिक लेखन, पुरस्कार अनुश्री देशमुख या विद्यार्थ्यांना मिळाला होता. त्याप्रित्यर्थ स्मृतीचिन्ह प्रदान करून कलाकारांचे विशेष कौतुक यावेळी करण्यात आले.

प्रास्ताविकात मुख्यप्रशासकिय अधिकारी डॉ. राजेंद्र कांकरीया म्हणाले, सध्या महाविद्यालयात 6500 विद्यार्थी विविध शाखेत शिक्षण घेत आहे. विद्यार्थी व त्यांच्या पालकांच्या वतीने बनविण्यात येणाऱ्या वस्तूंना बाजारपेठ मिळावी. या उदात्त हेतूने दिवाळी सणाचे औचित्य साधून एक दिवसीय हस्तकलेचे प्रदर्शन व विक्रीचे नियोजन महाविद्यालयाच्या महिला कल्याण समितीच्या वतीने करण्यात आले.

यावेळी संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा, उपप्राचार्या डॉ.क्षितीजा गांधी, डॉ. जयश्री मुळे आदींनी स्टॉलधारकांना भेट दिली. या उपक्रमाचे सूत्रसंचालन महिला कल्याण समितीच्या समन्वयिका प्रा. रूपाली देशपांडे यांनी केले., आभार प्रा. तृप्ती महाबरे यांनी मानले.

# ‘जसं बोलले तसंच केलं’; ‘पुणे बदलतंय’

## टॅग लाईनवरून सुप्रिया सुळेंचा भाजपाला टोला

**।पुणे ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

*‘पुणे शहराची एक वेगळी ओळख होती. मात्र, मागील पाच वर्षात महापालिकेतील सत्ताधारी पक्षाने पुणेकर नागरिकांना पायाभूत सुविधा देण्यात अपयशी ठरले आहे’. असं म्हणत खासदार सुप्रिया*



*सुळे यांनी भाजपावर निशाणा साधला. सुप्रिया सुळे सध्या पुणे जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. आज त्यांनी पुण्यातील हवेली तालुक्याला भेट दिली. यावेळी त्यांनी उरुळी देवाची येथील सावली हौसिंग सोसायटीमध्ये राहणाऱ्या नागरिकांशी त्यांनी संवाद साधला. भाजपाने ‘पुणे बदलतंय’ अशी टॅगलाईन केली होती. ती अगदी बरोबर ठरली. जागोजागी कचऱ्याचे ढीग, पावसाळ्यात रस्त्यावर पाणी साचल्याचे आपल्या दिसून येत आहे. त्यामुळे त्यांची टॅगलाईन अगदी बरोबर आहे. नेमकं त्यांना काय म्हणायचं होतं ते आपल्या लक्षात आले नाही. त्यामुळे नियोजनाच्या अभावामुळे पुणेकर नागरिकांना त्रासाला सामोरे जाव लागत आहे, असा आरोपही त्यांनी केला. माझी भारतीय जनता लॉँड्रीला विनम्र विनंती आहे. आठ वर्ष केंद्रात, पाच वर्ष राज्यात आणि पुणे महापालिकेत सत्ता होती. आता राज्यात पुन्हा एकदा सरकार त्यांच आलं आहे. त्यामुळे काही झालं तरी राष्ट्रवादीवर आरोप करणे हे हास्यास्पद असल्याचेही सुप्रिया सुळे म्हणाल्या.अंधेरी पोटनिवडणुकीबाबत मला दुर्दैवी वाटत. एखाद्या कुटुंबातील कर्ता पुरुष गेल्यावर त्याच्या कुटुंबामधील पत्नी किंवा इतर सदस्य निवडणूक लढू इच्छित असेल तर इतक्या टोकाची भूमिका कोणी घेत असल्यास ते योग्य नाही. ही आपली भारतीय संस्कृती नाही, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.*

## दिवाळी खरेदीसाठी झुंबड मध्यभागात कोंडी

### सुट्टी असल्याने शहर तसेच उपनगरातील नागरिकांनी खरेदीसाठी लक्ष्मी रस्ता, मंडई, तुळशीबाग परिसरात गर्दी केल्याने वाहतूक विस्कळीत

**।पुणे। महाईन्यूज ।**

दिवाळी खरेदीसाठी मध्यभागात रविवारी मोठी गर्दी झाली. सुट्टी असल्याने शहर तसेच उपनगरातील नागरिकांनी खरेदीसाठी लक्ष्मी रस्ता, मंडई, तुळशीबाग परिसरात गर्दी केल्याने वाहतूक विस्कळीत झाली. दिवाळीचा प्रारंभ शुक्रवारपासून (२१ ऑक्टोबर) होत आहे. सोमवारी नरकचतुर्दशी आणि लक्ष्मीपूजन आहे. नरकचतुर्दशीच्या दिवशी नवीन कपडे परिधान करण्याची प्रथा आहे. रविवारी (१६ ऑक्टोबर) सुट्टी असल्याने खरेदीसाठी शहर तसेच उपनगरातील नागरिकांनी सकाळपासून मध्यभागातील लक्ष्मी रस्ता, कुमठेकर रस्ता, मंडई, शनिपार, तुळशीबाग परिसरात गर्दी



**कोंडी सुटेना**

**दिवाळी खरेदीसाठी मध्यभागात मोठ्या संख्येने नागरिक खरेदीसाठी गर्दी करतात. गर्दीचे नियोजन तसेच वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी वाहतूक पोलीस नेमण्यात आले आहेत. मात्र, मोठ्या संख्येने वाहने रस्त्यावर आल्याने वाहतुकीचे नियोजन करणाऱ्या पोलिसांची तारांबळ उडाली. वाहनांचे कर्णकर्कश हॉर्न, कोंडी, बेशिस्तपणे लावलेली वाहनांमुळे अनेकांना त्रासाला सामोरे जावे लागले. कोंडी सोडविताना पोलीस हतबल झाले. महर्षी विट्ठल रामजी शिंदे, नदीपात्रातील रस्त्यावर मोटारी, दुचाकी लावून अनेकजण सहकुटुंब खरेदीसाठी आले होते. मंडई, नारायण पेठेतील वाहनतळावर मोटारी लावण्यास जागा उपलब्ध नसल्याने या भागात मोटारींच्या रांगा लागल्याने वाहतूक विस्कळीत झाली होती.**

केली होती. शिवाजी रस्ता आणि लक्ष्मी रस्त्यावर खरेदीसाठी मोठ्या संख्येने नागरिक आले होते. त्यामुळे या भागातून चालणे देखील अवघड झाले होते. कोंडी आणि गर्दीतून वाट काढत नागरिकांनी खरेदी केली. रविवार पेठेतील बोहरी आळी, कापड गंज, मोती चौक, पासोड्या विठोबा मंदिर परिसरात सजावट आणि विद्युत रोषणाईचे साहित्य खरेदीसाठी गर्दी झाली होती. अनेकजण मध्यभागात मोटारीतून खरेदीसाठी आले होते.

मोटारी आणि दुचाकी वाहनचालक मोठ्या संख्येने रस्त्यावर आल्याने मध्यभागातील प्रमुख रस्त्यांसह गल्ली बोळातील वाहतूक विस्कळीत होऊन कोंडी झाली होती. कुमठेकर रस्ता, टिळक रस्ता, बाजीराव रस्त्यावर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. कोंडीमुळे खरेदीसाठी आलेले नागरिक आणि स्थानिक रहिवाशांना त्रासाला सामोरे जावे लागले.

## मावळातील शेतकऱ्यांकडून कृत्रिम फुलांवर बंदीची मागणी

### केंद्रीय कृषीमंत्र्यांना विविध मागण्यांचे निवेदन



**।पुणे। महाईन्यूज ।**

कृत्रिम प्लास्टिक फुलांमुळे पर्यावरणाची हानी होत आहे. कृत्रिम फुलांवर बंदी घालण्याची मागणी मावळ तालुक्यातील शेतकऱ्यांनी केली आहे. तसेच हरितगृह उभारण्याची मर्यादा किमान पाच एकरांपर्यंत करण्याची मागणी करण्यात आली आहे.याबाबत मावळातील शेतकऱ्यांनी केंद्रीय कृषीमंत्री नरेंद्रसिंह तोमर यांना निवेदन दिले आहे. महाराष्ट्रातील शेती विषयक समस्या जाणून घेण्यासाठी तोमर राज्याच्या दौऱ्यावर आले आहेत.

मावळ तालुक्यातील फूल उत्पादक शेतकरी मुकुंद ठाकर, ज्ञानेश्वर आडकर, दिलीप काळे, तानाजी शेंडगे, चंद्रकांत कालेकर, हेमंत कापसे, जयसिंग हुलावळे, ज्ञानेश्वर टाकर, रामदास पवार आदींनी तोमर यांना निवेदन देऊन शेतकऱ्यांच्या समस्येकडे लक्ष वेधले.

## सोळा टन ई-कचऱ्याचे संकलन

**।पुणे। महाईन्यूज ।**

ई-कचरा आणि प्लास्टिक संकलन अभियनात रविवारी सोळा टन ई-कचरा, सहा टन प्लास्टिक, ७०० किलो थर्माकोल संकलन करण्यात आले. शहरातील तीनशे ठिकाणी अभियान राबविण्यात आले.पुणे महापालिकने कमिन्स इंडिया फाउंडेशन, आदर पूनावाला क्लीन सिटी इनिशिएटिव्ह, जनवाणी, पूर्णम इकोव्हिजन फाउंडेशन, थंब क्रिएटिव्ह, सागरमित्र, मालक्ष्मी, इ-रिसायक्लर, के. के. नाग प्रा. लिमिटेड आदी संस्थांच्या मदतीने हा उपक्रम रविवारी राबविला. ई-कचरा आणि प्लास्टिकबाबत जनजागृतीही करण्यात आली. शैक्षणिक संस्थांकडूनही एक हजाराहून अधिक स्वयंसेवक अभियानासाठी दिले. शिवाजीनगर येथील चित्तरंजन वाटिका येथून अभियनाला महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांच्या हस्ते प्रारंभ झाला. घनकचरा व्यवस्थापन





विभागाच्या उप आयुक्त आशा राऊत, स्वच्छ अभियनाचे ब्रॅण्ड ॲम्बेसेडर डॉ. सलील कुलकर्णी, ऋतुजा भोसले, कमिन्स इंडियाचे आर. एस. कुलकर्णी, सौजन्या वेगुरू यावेळी उपस्थित होते.ओला आणि सुका कचऱ्याचे वर्गीकरण करावे, असे आवाहन विक्रम कुमार यांनी केले. ई-कचरा संकलनासाठी शहरातील दोनशे उद्यानात ई-कचरा संकलन केंद्र सुरू करण्यात येईल, असे कुमार यांनी सांगितले. आशा राऊत यांनी घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली.

# शिक्षण सेवकांचा महापालिका भवनात आनंदोत्सव!

## नियमित नोकरी मिळाल्याने जल्लोष : आमदार महेश लांडगे यांची उपस्थिती



पदवीधर शिक्षक संघटनेच्या सततच्या पाठपुराव्यामुळे व आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने शिक्षण सेवकांना दिवाळी पूर्व आज नियमिततेचे आदेश प्रशासनामार्फत मा.आमदार श्री.महेशदादा लांडगे यांच्या उपस्थितीत देण्यात आले आहेत. प्रशासनातर्फे सहकार्य केल्याने निश्चितच ६८ शिक्षण सेवकांची दिवाळी गोड झाली आहे.

- मनोज मराठे,
राज्य सचिव, महाराष्ट्र राज्य पदवीधर' प्राथमिक शिक्षक व केंद्रप्रमुख सभा.

**पिंपरी-चिंचवड ।। महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

महापालिकेच्या ६८ शिक्षण सेवकांना भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांच्या उपस्थितीत नियमिततेचे आदेश करण्यात आले. यावेळी संबंधित शिक्षण सेवकांनी आंनंदोत्सव साजरा केला. महापालिका भवनात झालेल्या या कार्यक्रमात शिक्षण सेवकांनी अक्षरशः जल्लोष केला.

पिंपरी- चिंचवड महापालिका अंतर्गत काम करणारे ६८ शिक्षण सेवक नियमित सेवेत घेण्यात आले आहेत . त्यामुळे ३ वर्षे सेवाकाळ पूर्ण केलेल्या शिक्षण सेवकांना पदवीधर संघटना व आमदार महेश लांडगे यांच्या प्रयत्नामुळे "दिवाळी गिफ्ट" मिळाले आहे. पदवीधर शिक्षक संघटनेचे अध्यक्ष मनोज मराठे यांनी शिक्षण सेवकांना नियमिततेचे आदेश विनाविलंब मिळावेत यासाठी आमदार महेश लांडगे यांच्या माध्यमातून पाठपुरावा सुरू केला होता.

तसेच आयुक्त व प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील , उप आयुक्त संदीप खोत, प्रशासन अधिकारी श्री.नाईकडे यांचीही भेट घेऊन शिक्षण सेवकांना नियमित वेतन श्रेणीचे आदेश तातडीने मिळावेत यासाठी चर्चाही केली केली होती. आमदार लांडगे यांनी स्वतः पाठपुरावा करून संबंधित शिक्षण सेवकांना दिवाळी पूर्व आदेश मिळावेत या पदवीधर संघटनेची मागणी प्रशासनाकडे लावून धरली होती, अशी माहिती मनोज मराठे यांनी दिली.

दरम्यान, शनिवारी महापालिका भवनामध्ये आमदार लांडगे यांच्या हस्ते आणि अति. आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, अति. आयुक्त श्री.जितेंद्र वाघ , अति. आयुक्त उल्हास जगताप विभाग प्रमुख संदीप खोत उपस्थितीत शिक्षण सेवकांना नियमिततेचे आदेश देण्यात आलेत.

# विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रात चौकस रहावे!

## डॉ. दीपक शहा : डॉ. कलाम यांच्या जन्मदिनी पुस्तक वाचन व प्रदर्शन

**पिंपरी। ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**चिंचवड येथील कमला शिक्षण संकुल संचलित प्रतिभा महाविद्यालयात माजी राष्ट्रपती दिवंगत ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनानिमित्त पुस्तक वाचन व प्रदर्शनाचे आयोजन करून वाचन प्रेरणा दिन साजरा केला यावेळी संस्थेचे मुख्य प्रशासकिय अधिकारी डॉ. राजेंद्र कांकरीया यांनी फित कापून उद्घाटन केले. यावेळी प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे, उपप्राचार्या डॉ. क्षितीजा गांधी समवेत विविध विभागाचे विभागप्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.**



**डॉ. कलाम यांनी वर्तमानपत्रे विकून तसेच इतर कामे करून कुटुंबियांना मदत करीत असत. त्यांना गणित विषयाची विशेष रुची होती. प्रतिकुल परिस्थितीवर मात करून अभ्यास पूर्ण करीत होते, अभ्यास क्रमानंतर नासा या प्रसिद्ध संस्थेत काम केले. पुढे 2002 ते 2007 पर्यंत भारताचे 11 वे. राष्ट्रपती पद भुषविले**

सचिव डॉ. दीपक शहा पुढे म्हणाले, डॉ. कलाम यांनी वर्तमानपत्रे विकून तसेच इतर कामे करून कुटुंबियांना मदत करीत असत. त्यांना गणित विषयाची विशेष रुची होती. प्रतिकुल परिस्थितीवर मात करून अभ्यास पूर्ण करीत होते, अभ्यास क्रमानंतर नासा या प्रसिद्ध संस्थेत काम केले. पुढे 2002 ते 2007 पर्यंत भारताचे 11 वे. राष्ट्रपती पद भुषविले. भारत महासत्त बनून जगात नावलौकिक मिळवेल असे स्वप्न सर्व भारतीयांना दिले, त्या स्वप्नाची पूर्तता विद्यार्थ्यांनी देखील आपापल्या क्षेत्रात चमक दाखवून त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशिल रहावे, असे आवाहन केले.

या प्रदर्शनात स्पर्धा परीक्षा, शैक्षणिक समवेत साहित्य क्षेत्रातील माजब्बर लेखक पु.ल.देशपांडे, ग.दी. मांडगूळकर, डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम, राम गडकरी यांच्या पुस्तकासमवेत हिंदी, मराठी, इंग्रजी माध्यमाची पुस्तके मांडण्यात आली होती., प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी ग्रंथपाल मीना डोंगरे, सहाय्यक ग्रंथपाल सचिन गायकवाड, सीमा इंगळे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

## संपादकीय

# सायबरयुगातील 'तक्षक'

***तक्षकाच्या विषारी चुळांना घाबरुन महालात दडी मारुन बसलेला शापित राजा परीक्षित याला अखेर मृत्यूने गाठलेच. प्रचंड सुरक्षेला न जुमानता तक्षकाने फळातील अळीचे रुप घेऊन त्याच्या महालात प्रवेश केला, आणि त्याला विषारी डंख केलाच, अशी आख्यायिका महाभारतात आढळते.***

तक्षकाच्या विषारी चुळांनीच कलियुगाची नांदी झाली होती असे म्हणतात. पुराणकथांमधील हे रुपक सध्याच्या सायबरयुगातही किती सुसंगत वाटते. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या पूर्णत: कह्यात गेलेले मानवी विश्व इंटरनेटचे मायाजाल आणि समाजमाध्यमांच्या गदारोळात एकमेकांना जितके घट्ट बांधले गेले, तितकेच ते अधिकाधिक असहायदेखील होत गेले. गेले काही दिवस लैंगिक छळणूक आणि ब्लॅकमेलिंग, म्हणजेच 'सेक्सटॉर्शन'च्या बातम्या वारंवार येताना दिसत आहेत. हे प्रकार वाढीस लागलेले पाहून कुठलाही सुजाण नागरिक अस्वस्थ होईल. -ही त्या आधुनिक तक्षकाचीच देणगी! समाजमाध्यमांवर तासंतास घालवणाऱ्या व्यक्तीस हेरुन खोट्या खात्यावरुन मायाजालात ओढायचे आणि त्या व्यक्तीची अवघड अवस्थेतील छायाचित्रे अथवा चित्रफिती मिळवून पैसे उकळण्याचा धंदा सुरु करायचा, याला म्हणायचे सेक्सटॉर्शन.

माध्यमांवरले चांगले चेहरे हुडकून त्याचे विचित्रीकरण किंवा मॉर्फिंग करुनही असले प्रकार केले जातात. सदरील व्यक्ती लज्जाभयास्तव, ब्लॅकमेलिंगला बळी पडते आणि पैसे देऊन मोकळी होते. असल्याच विकृत गुन्हेगारीला पुण्यातील दोन युवक बळी पडल्याचे दिसते. समाजात छिःथू होईल, या भीतीने या युवकांनी आपले आयुष्य संपवले. गेल्या आठवड्यात मुंबईतील बांद्रे येथील एका ६४वर्षीय गृहस्थानेही अशाच सेक्सटॉर्शनची तक्रार पोलिसात गुदरली होती. या प्रकारात त्याचे तब्बल १८ लाख रुपये उकळले गेले. ओडिशामध्ये सेक्सटॉर्शनचे प्रचंड मोठे रॅकेट चालवणाऱ्या एका महिलेला पोलिसांनी गेल्याच आठवड्यात अटक केली होती. गेल्या वर्षी, २०२१ मध्ये पुण्यात लैंगिक ब्लॅकमेलिंगची सुमारे ६८५ प्रकरणे आली. यंदाचे वर्ष अजून संपलेले नाही, परंतु, हा आकडा आत्ताच १४४५ इतका मोठा झाला आहे. याशिवाय बाहेर न फुटलेली प्रकरणे हजारोंच्या संख्येने असतील, हे ओळखायला सरकारी आकडेवारीची गरजच नाही.



## आनंदी सकाळ

# शिवरूप व गुरुरूपाच्या अद्वैताची प्रचीती अनुभवा

त्र्यंबकेश्वर क्षेत्री साकारलेले श्री गुरुकुल पीठ श्री स्वामी महाराजांच्या चैतन्याचे अखंड निवासस्थान आहे. दश महाविद्यांच्या तेजाचा स्रोत येथे नित्य प्रवाहित आहे. 'श्री' यंत्राची दैवी शक्ती येथे सामावली आहे. सेवा भावनेने, अनन्य श्रद्धेने येणाऱ्यास येथे प्रचीती होते. हठयोगादि कठीण, असाध्य साधनेने जे अप्राप्य ते आत्मज्ञान अनुभवसिद्ध बनवण्याची किमया असलेल्या गुरुकुल प्रकल्पाच्या प्रत्येक कणाकणात सरस्वती व्याप्त आहे. साध्या दृष्टीचा विषय असलेले नामरूपादि विश्व सोडून त्यात नित्य सामावलेले शाश्वत चैतन्य, अखंड परब्रह्मतत्त्व शुद्ध अंतःकरणाच्या सेवेकऱ्याला अनुभवता यावे. त्यातून आनंदाच्या लहरी त्यास सर्वत्र प्रसारित करता याव्यात, यासाठी हे गुरुकुल पीठ साकारले आहे. संसारी माणसांच्या हृदयसंवेदनेशी ते जोडलेले आहे आणि याच माणसांच्या उद्धारासाठी सज्ज झालेले अपूर्व सिद्धपीठही ते आहे.




# हिजाबचा वाद-प्रतिवादाचा निवाडा




मुस्लीम समाजप्रबोधनात जाबमुक्ती ही स्त्रीदास्यमुक्तिच्या मार्गातील एक प्रमुख टप्पा आहे. अलीकडे वारंवार पुढे येणाऱ्या घटनांतून असे लक्षात येते की, संविधानाने दिलेला धर्मस्वातंत्र्याचा अर्थ समजून घेण्यास भारतीय समाज अद्याप परिपक्व झालेला नाही.

याचे चालू उदाहरण म्हणजे कर्नाटकातील उडुपी येथील कनिष्ठ महाविद्यालयात काही मुस्लीम विद्यार्थिनींनी हिजाब परिधान करून वर्गात बसण्यासाठी केलेला आग्रह. संबंधित शिक्षण संस्थेने यास हरकत घेऊन सर्व विद्यार्थ्यांना गणवेश अनिवार्य असल्याचे सांगितले. या भूमिकेचे पडसाद समाजात उमटले. या विषयाला हिंदू-मुस्लीम वादाचे आयाम तयार निर्माण झाले. हा विषय भारतभर पसरला आणि हिंदू-मुस्लीम धर्मवादी संघटनांनी, राजकीय पक्षांनी उग्र स्वरूप देऊन भडकवला. कर्नाटक सरकारने शिक्षण संस्थेतील धर्मनिरपेक्षता आणि गणवेशाचा मुद्दा पुढे करून ५ फेब्रुवारी २०२२ रोजी शिक्षण संस्थांत हिजाबबंदीसह सर्वधर्मसमूहासाठी धार्मिक वेशभूषा आणि प्रतीके परिधान करण्याविरुद्ध कायदा केला. या कायद्याविरोधात कर्नाटक उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. त्यावर उच्च न्यायालयाने १५ मार्च २०२२ रोजी आपल्या निवाड्यात कर्नाटक सरकारने केलेला कायदा योग्य असल्याचे मत नोंदवले. या निवाड्याविरोधात २६ याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाल्या. न्या. हेमंत गुप्ता आणि न्या. सुधांशू धुलिया या द्विसदस्य खंडपीठाने तब्बल दहा दिवस या विषयावरील सुनावणी ऐकून त्यावर १३ ऑक्टोबर २०२२ रोजी निकाल दिला. परंतु या दोन न्यायमूर्तींचे निरिक्षणे आणि मत भिन्न ठरल्यामुळे सदरचे प्रकरण सरन्यायाधीशांकडे पाठवण्यात आले असून आता त्याची मोठ्या खंडपीठापुढे सुनावणी होण्याची शक्यता आहे. या धार्मिक ध्रुवीकरणाच्या तसेच समाजप्रबोधनाच्या विषयाचा सोक्षमोक्ष लागेल अशी अपेक्षा होती. तथापि अजून काही काळ प्रतीक्षा करावी लागणार आहे. वास्तविक हिजाब हा विषय धर्मस्वातंत्र्याचा, व्यक्तिस्वातंत्र्याचा, लोकशाहीचा किंवा विविधतेचा मुद्दा कमी आणि अलगता, विषमता, दमनाचा, पुरुषप्रधानतेचा तसेच धर्मवादी राजकारणाचा जास्त असल्याने तो प्रगतिशील समाज निर्माण करण्याचा तथा समाजप्रबोधनाचा मुद्दा आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निवाड्यात असे लक्षात येते की, हिजाब हा धर्माचा अविभाज्य भाग आहे

# चित्त्यांसाठी हत्तींवर संक्रांत ?

**वाघ, सिंह, चित्ते हे पर्यटक तसेच सामान्यजनात लोकप्रिय असलेले प्राणी वाचवले की प्रसिद्धी मिळते, नेत्यांच्या वलयांकितपणात वाढ होते, अवाढव्य व महाकाय हत्तीच्या बाबतीत असे नाही या भूमिकेतून भारताने नामिबियाला आश्वासन दिले असेल काय? १९७२ च्या कायद्यानुसार देशात वन्यजीवांच्या शिकारीवर बंदी आहे.**

देशातून नामशेष झालेल्या एका प्राण्याला आणण्यासाठी दुसऱ्या प्राण्याचा जीव धोक्यात कसा टाकला जाऊ शकतो? 'चित्ता जगवा, हत्ती मारा' असे सरकारी धोरण आहे काय? मग भारतात अस्तित्वात असलेल्या वन्यजीव संरक्षणविषयक कायद्यांचा उपयोग काय? यांसारखे अनेक प्रश्न भारत व नामिबिया यांच्यातील चित्ता हस्तांतर कराराचा तपशील 'इंडियन एक्स्प्रेस'ने उघड केल्यावर उपस्थित होणे स्वाभाविक. या करारात हस्तिदंतांच्या व्यापारावर असलेली बंदी उठवण्यासंबंधीचा थेट उल्लेख नसला तरी त्या देशाच्या पर्यावरण मंत्रालयाने बंदी उठवण्यासाठी भारताची मदत मिळेल असे केलेले वक्तव्य पडद्याआड घडलेल्या बऱ्याच गोष्टी उघड करणारे आहे. चित्त्यांच्या बदल्यात ही बंदी उठवण्यासाठी मदत करू, अशी भूमिका भारताने घेतली असेल तर ते हस्तिदंतासह दुर्मीळ वन्य संपदेचा



(प्राणी आणि वनस्पती) व्यापार रोखणाऱ्या बहुदेशीय समझोत्याचा – 'साइट्स'चा भंग करणारे ठरेल. वाघ, सिंह, चित्ते हे पर्यटक तसेच सामान्यजनात लोकप्रिय असलेले प्राणी वाचवले की प्रसिद्धी मिळते, नेत्यांच्या वलयांकितपणात वाढ होते, अवाढव्य व महाकाय हत्तीच्या बाबतीत असे नाही या भूमिकेतून भारताने नामिबियाला आश्वासन दिले असेल काय? १९७२ च्या कायद्यानुसार देशात वन्यजीवांच्या शिकारीवर बंदी आहे. २००२ च्या जैवविविधता कायद्यानुसार या श्रेणीत येणारे प्रत्येक प्राणी, वस्तू व परिसराचे संरक्षण करणे सरकारचे कर्तव्य आहे. शिवाय 'साइट्स' या आंतरराष्ट्रीय समझोत्यावर भारताने १९७६ मध्येच स्वाक्षरी केली आहे तर नामिबियाने १९९० मध्ये स्वाक्षरी करूनही, आजवर हस्तिदंत-निर्यातीचे ३५० हून अधिक प्रकार त्या देशातून झाले आहेत. या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करत रशियाची उघड बाजू घेणाऱ्या, चीनधार्जिण्या नामिबियासाठी भारत आता भूमिका बदलणार असेल तर ते वाईटच. एकदा हा हस्तिदंताचा व्यापार सुरू झाला की या प्राण्याच्या शिकारीत वाढ होणार हे ओघाने आलेच.. मग ते हत्ती नामिबियातील का असेनात. आजच्या घडीला जागतिक पातळीवर दहा लाख रुपये किलो या दराने हत्तीचे सुळे विकले जातात. ऑनलाइन पद्धतीने होणाऱ्या व्यापाऱ्यात अनेक टोळ्या सक्रिय आहेत. नामिबियातील हस्तिदंत विक्रीला अभय देणे हे त्या टोळ्यांच्याही पथ्यावरच पडेल. तसे झाल्यास, आपल्या देशातही सध्या शिल्लक असलेल्या व संकटग्रस्ताच्या यादीत असलेल्या ३० हजार हत्तींचे काय होणार हे सांगण्यासाठी कुण्या भविष्यवेत्त्याची गरज नाही.

## ।। अभंगवाणी ।।




उपाधीच्या नांवें घेतला सिंतोडा ।
नेदूं आतां पीडा आतळों ते ।।१।।
काशासाठीं हात भरूनि धुवावे ।
चालतिया गोवे मारगासि ।।ध्रु.।।

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### नागपूरमधील 'रस्त्यांची रांगोळी' म्हणत राष्ट्रवादीने देवेंद्र फडणवीसांना लगावला टोला



।नागपूर। महाईन्यूज।

राज्याच्या अनेक भागांतील रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. या खड्ड्यांमुळे अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. राज्यभरात या खड्ड्यांमुळे आंदोलनेही करण्यात आलीत. मात्र अद्याप रस्त्यावरील खड्डे बुजवण्यात आलेले नाहीत. या खड्ड्यांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी कॉंग्रेसने राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीकास्त्र सोडली आहेत. ट्विटरवर नागपूरमधील खड्ड्यांचे फोटो शेअर करत फडणवीस यांच्यावर टीका केली. राष्ट्रवादी कॉंग्रेसने ट्विटरवर फोटो शेअर करत फडणवीसांना टोला लगावला.

# भाजपवर दबाव वाढला!

## शिंदे गटातील आमदाराचीही निवडणूक बिनविरोध करण्याची मागणी

।मुंबई। महाईन्यूज।

**अंधेरी पूर्व विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात राजकीय वातावरण तापताना दिसत आहे. यादरम्यान शिंदे गटातील आमदार प्रताप सरनाईक यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहीत अंधेरी पोटनिवडणूक बिनविरोध करा अशी मागणी केली आहे. यापूर्वी मनसे अध्यक्ष राज ठाकरे राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांच्यानंतर शिंदे गटातील आमदार प्रताप सरनाईक यांनी मागणी केल्याने भाजपवर दबाव वाढला आहे.**



**मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी अंधेरी पोटनिवडणूक बिनविरोध करत महाराष्ट्रीती राजकीय संस्कृती दाखवून देण्याचे आवाहन भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून केलं होतं, त्यानंतर आज त्यावरून राजकीय पडसाद पाहायाला मिळाले होते. राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी देखील पत्रकार परिषद घेत असेच आवाहन केले होते.**

प्रताप सरनाईक यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिलेल्या पत्रात मागणी केली आहे की, तुमच्या राज शिष्टाचाराचा वापर करून भाजपच्या वरिष्ठ नेत्यांशी बोलावे आणि अंधेरीची पोटनिवडणूक बिनविरोध कशी होईल याकडे लक्ष द्यावे. आपली राजकीय संस्कृती पाहाता एकाद्या आमदाराचे निधन झाल्यानंतर त्याच्या नातेवाईकाला तिकीट मिळाले तर त्यावेळी ती निवडणूक नेहमी बिनविरोध झाली आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील राजकीय संस्कृती जपावी अशी मागणी प्रताप सरनाईक यांनी त्यांच्या पत्रातून केली आहे.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी अंधेरी पोटनिवडणूक बिनविरोध करत महाराष्ट्रीती राजकीय संस्कृती दाखवून देण्याचे आवाहन भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून केलं होतं, त्यानंतर आज त्यावरून राजकीय पडसाद पाहायाला मिळाले होते. राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी देखील पत्रकार परिषद घेत असेच आवाहन केले होते.

दरम्यान त्यानंतर आता शिंदे गटातून देखील अशीच मागणी समोर आल्याने आता एकनाथ शिंदे , भाजप याबाबद काय भूमिका घेतात ते पाहाणे महत्वाचे ठरणार आहे.

# आम्ही कोणी खेळामध्ये राजकारण आणत नाही!

## शरद पवारांचे बीसीसीआय आणि एमसीए निवडणुकांबाबत वक्तव्य

।मुंबई। ।महाईन्यूज।

'बीसीसीआय आणि एमसीए निवडणूका होत आहेत. खेळामध्ये आम्ही कोणी राजकारण आणत नाही, राजकीय भूमिका घेत नाही', असे वक्तव्य राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी केले. येत्या काळाता बीसीसीआय आणि एमसीए निवडणुका होणार आहेत. या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी सिल्व्हर ओक निवासस्थानी झालेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते.



"बीसीसीआय आणि एमसीए निवडणूका होत आहेत. खेळामध्ये आम्ही कोणी राजकारण आणत नाही, राजकीय भूमिका घेत नाही. ज्यावेळी बीसीसीआय अध्यक्ष असताना नरेंद्र मोदी हे सुद्धा गुजरातचे मुख्यमंत्री असल्याने उपस्थित रहात होते. एमसीए ही चांगली संघटना आहे. देशामध्ये राज्य संघटना म्हणून एमसीए ही प्रभावी संघटना म्हणून कार्यरत आहेत. या संघटनेचे साधारणतः ४०० सदस्य असतील पण यापैकी कुणीही राजकारण यामध्ये आणत नाही", असे शरद पवार यांनी म्हटले.याशिवाय अंधेरी पोटनिवडणुकीबाबत पक्षाची भूमिका शरद पवार यांनी स्पष्ट केली. यावेळी पत्रकार परिषदेत बोलताना 'अंधेरी पोटनिवडणूक ही बिनविरोध व्हावी', अशी भूमिका शरद पवार यांनी पत्रकार परिषदेत मांडली.अंधेरी पूर्व विधानसभेची पोटनिवडणूकीची प्रक्रिया सुरू झाली आहे. ही निवडणूक साधारणतः दीड वर्षाच्या कालावधीसाठी आहे. आमदार रमेश लटके यांचे निधन झाल्याने ही जागा रिक्त झाली आहे. भाजपाचे मुरजी पटेल यांनी या निवडणुकीसाठी अर्ज दाखल केला आहे. महाराष्ट्रात गोपीनाथ मुंडे यांच्या दुर्दैवी मृत्यूनंतर पोटनिवडणूक जाहीर झाली होती.

त्यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा अध्यक्ष म्हणून राष्ट्रवादी कॉंग्रेस गोपीनाथ मुंडे यांच्या परिवारातील कोणी उमेदवार उभा राहत असेल तर उमेदवार उभा करणार नाही असा निर्णय घेतला होता याची आठवण शरद पवार यांनी सर्व राजकीय पक्षांना यावेळी करुन दिली.

# पश्चिम रेल्वेच्या 30 अतिरिक्त फेस्टिव्हल ट्रेन

## 18 ऑक्टोबरपासून सुरु होणार आरक्षण

।मुंबई ।महाईन्यूज।

सुट्ट्यांचा आनंद लुटण्यासाठी पश्चिम रेल्वे मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी एक आनंदाची बातमी आहे. कारण पश्चिम रेल्वे मार्गावर दिवाळीनिमित्त 30 अतिरिक्त फेस्टिव्हल ट्रेन धावणार आहेत. या 30 ट्रेनचे आरक्षण विशेष शुल्कासह 18 ऑक्टोबरपासून सर्व संगणकीकृत सुरक्षा केंद्रावर आणि आयआरसीटीसीच्या संकेस्थळावर सुरू होणार आहे. वांद्रे टर्मिनस ते गांधीधाम, भावनगर, भगत की कोठी आणि वडोदरा ते हरिद्वारदरम्यान या अतिरिक्त फेस्टिव्हल विशेष रेल्वे गाड्या धावणार आहेत. त्यामुळे प्रवाशांना गर्दीच्या वेळेस दिलासा मिळणार आहे. पश्चिम रेल्वेच्या 30 अतिरिक्त फेस्टिव्हल ट्रेन



ट्रेन क्रमांक ०९४१५ वांद्रे टर्मिनस - गांधीधाम सुपरफास्ट स्पेशल वांद्रे टर्मिनस येथून दर गुरुवारी सायंकाळी ७.२५ वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ८.४० वाजता गांधीधामला पोहोचेल. ही ट्रेन २० ऑक्टोबर ते १० नोव्हेंबरपर्यंत धावणार आहे.

ट्रेन क्रमांक ०९४१६ गांधीधाम - वांद्रे टर्मिनस सुपरफास्ट स्पेशल ही ट्रेन गांधीधामहून दर गुरुवारी रात्री १२.३० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी दुपारी २ .२० वाजता वांद्रे टर्मिनसला पोहोचेल.

ट्रेन क्रमांक ०९२०७ वांद्रे टर्मिनस - भावनगर स्पेशल वांद्रे टर्मिनस येथून दर शुक्रवारी सकाळी ९.१५ वाजता सुटेल आणि त्याच दिवशी भावनगरला रात्री ११.४५ वाजता पोहोचेल. ही ट्रेन २१ ऑक्टोबर ते १८ नोव्हेंबरपर्यंत धावणार आहे.ट्रेन क्रमांक ०९२०८ भावनगर - वांद्रे टर्मिनस स्पेशल भावनगरहून दर गुरुवारी दुपारी २.५० वाजता सुटेल आणि वांद्रे टर्मिनसला दुसऱ्या दिवशी सकाळी ६ वाजता पोहोचेल. ही ट्रेन २० ऑक्टोबर ते १७ नोव्हेंबरपर्यंत धावेल. या दोन्ही ट्रेनच्या दहा फेऱ्या असणार आहे.ट्रेन क्रमांक ०९०९३ वांद्रे टर्मिनस - भगत की कोठी स्पेशल वांद्रे टर्मिनसवरून दर शनिवारी सकाळी ९.३० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ९.३० वाजता भगत की कोठी येथे पोहोचेल.

# “काश्मीर खोऱ्यात हिंदू सुरक्षित नाहीत, आमचे मुस्लीम शेजारीही...,”

## दहशतवाद्यांनी काश्मिरी पंडिताची हत्या केल्यानंतर बहिणीचा आक्रोश



### ‘दहशतवादी सर्व काश्मिरी पंडितांची हत्या करतील’

**दहशतवादी परिसरातील हिंदूंची हत्या करण्यासाठी संधी शोधत असल्याचा दावा त्यांनी केला आहे. त्या म्हणाल्या आहेत की “काही आठवड्यांपूर्वी दहशतवादी शाळेत घुसले होते. ते हिंदू शिक्षकांना शोधत होते. सुदैवाने तिथे कोणीही हिंदू शिक्षक नव्हते. मी सर्व हिंदूंना खोरं सोडून जा असं आवाहन करते. दहशतवादी सर्व काश्मिरी पंडितांची हत्या करतील”.**

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

जम्मू-काश्मीरच्या शोपियाँ जिल्ह्यात शनिवारी आणखी एका काश्मिरी पंडिताची दहशतवाद्यांनी गोळ्या झाडून हत्या केली. यानंतर संपूर्ण देशभरात संतापाची लाट आहे. दक्षिण काश्मीर जिल्ह्यातील चौधरी गुंड भागात पूरन कृष्ण भट यांच्यावर त्यांच्या घराजवळ हल्ला करण्यात आला. रुग्णालयात दाखल केलं असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलं. हत्येच्या काही तासांनंतर ‘काश्मीर फ्रीडम फायटर्स’ या दहशतवादी संघटनेने हल्ल्याची जबाबदारी घेतली. इतकंच नाही तर अशा प्रकारचे आणखी हल्ले करण्याचा इशाराही दिला आहे. रविवारी जम्मूमध्ये पूरन कृष्ण भटयांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी घोषणाही देण्यात आल्या. त्यांच्या मागे ४१ वर्षीय पत्नी, मुलगी आणि मुलगा आहे. दोन्ही मुलं शाळेत शिकत आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पूरन कृष्ण शोपियाँ येथील त्यांची वडिलोपार्जित मालमत्ता असणाऱ्या सफरचंदाच्या बागेत चालले होते. पूरन कृष्ण भट यांच्या बहिणीने दिलेल्या मुलाखतीत ‘काश्मीर खोऱ्यात हिंदू सुरक्षित नाहीत. आमचे मुस्लीम शेजारीही तुमची सुरक्षा करु शकत नाही असं सांगत आहेत,’ असं म्हटलं आहे. यावेळी त्यांनी शुक्रवारी फोन आल्यापासून आपल्या भावाला असुरक्षित वाटत होतं अशी माहिती दिली. “मी शुक्रवारी संध्याकाळी माझ्या भावाशी बोलले. त्याला असुरक्षित वाटत होतं. आम्ही त्याला खोरं सोडून जा म्हणून सांगितलं. पण त्याने मुलांसाठी पैशांची व्यवस्था करायचं आहे असं सांगितलं,” असं त्यांनी सांगितलं.

**पूरन कृष्ण भट यांच्या बहिणीने दिलेल्या मुलाखतीत ‘काश्मीर खोऱ्यात हिंदू सुरक्षित नाहीत. आमचे मुस्लीम शेजारीही तुमची सुरक्षा करु शकत नाही असं सांगत आहेत,’ असं म्हटलं आहे.**

# काँग्रेसच्या भारत जोडो यात्रेदरम्यान दुर्घटना!

## कर्नाटकात 4 कार्यकर्त्यांना बसला विजेचा शॉक



**। नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

काँग्रेस नेते राहुल गांधी हे सध्या भारत जोडो यात्रेवर आहेत. त्यांच्या यात्रेत प्रत्येक राज्यातून कार्यकर्त्यांची मोठी गर्दी पाहायला मिळतेय. दरम्यान ही यात्रा कर्नाटकात पोहचली त्यावेळी एक भीषण दुर्घटना घडली आहे. कर्नाटकच्या बळ्ळारीमध्ये यात्रेदरम्यान 4 कार्यकर्त्यांना विजेचा जब्बर शॉक लागला आहे. यात कार्यकर्ते जखमी झाले असून त्यांना उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

ही घटना रविवारी (16 ऑक्टोबर 2022) रोजी सकाळी कर्नाटकच्या बळ्ळारीमध्ये घडली आहे. या ठिकाणाहून आज काँग्रेसच्या भारत जोडो यात्रेला सुरुवात झाली. ही यात्रा मौका गावात पोहचली असताना काही कार्यकर्त्यांना अचानक विजेचा शॉक बसला, पक्षाचा झेंडा हातात घेऊन निघालेले कार्यकर्ते अचानक खाली कोसळले. यामुळे सुरुवातीला काहीशी गोंधळाची स्थिती निर्माण झाली, मात्र काही वेळातचं नेमकं काय घडलं हे इतरांच्या लक्षात आले.या घटनेवर काँग्रेसचे प्रवक्ते रणदीप सुरजेवाला यांनी सांगितले की, घटनास्थळी उपस्थित डॉक्टरांनी प्राथमिक उपचार करत रुग्णवाहिकेतून जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मात्र या घटनेमुळे कार्यकर्त्यांमध्ये काही वेळ गोंधळाचे वातावरण पाहायला मिळाले.

# रुपया घसरत नाहीय, डॉलर वधारतोय!

## अमेरिकेतील पत्रकार परिषदेत सीतारामन यांची माहिती

**।नवी दिल्ली। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**



गेल्या काही दिवसांपासून भारतीय रुपया घसरत आहे. मात्र, यावर उत्तर देताना देशाच्या केंद्रीय मंत्री म्हणाल्या की, ही रुपयाची घसरण नाही तर डॉलर वधारत आहे. रुपयाची घसरण होण्यापासून आरबीआय प्रयत्न करत असल्याचंही सीतारामन यांनी सांगितलं. निर्मला सीतारामन सध्या अमेरिकेच्या दौऱ्यावर आहेत. वॉशिंग्टन डीसीमध्ये त्यांनी एक पत्रकार परिषद घेतली. त्यावेळी त्या बोलत होत्या.

रुपया सातत्याने घसरत असल्याच्या प्रश्नावर त्या म्हणाल्या की, रुपया घसरत आहे अशा दृष्टीने मी पाहत नाही. मात्र, डॉलरची किंमत मजबूत होत अशा अर्थाने मी रुपयाच्या घसरणीकडे पाहते. डॉलर वधारल्याने त्यांच्या तुलनेत कमी असलेल्या चलनात घसरण होणार. इतर देशांच्या तुलनेत भारतीय चलन चांगली कामगिरी करत आहे. तसंच, रुपयाची घसरण थांबवण्याकरता भारतीय रिझर्व्ह बँक प्रयत्नशीर आहे, असंही निर्मला सीतारामन म्हणाल्या.

आम्ही क्रिप्टोकरन्सीच्या प्रकरणी जी२० देशांसोबत चर्चा करणार आहोत.

# मुसळधार पावसामुळे गोव्यात हाहाकार!

## दूधसागर धबधब्याजवळ अडकलेल्या 40 पर्यटकांना वाचवण्यात यश

**। गुवाहाटी । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**



ऑक्टोबर संपत आला मात्र अद्याप पाऊस थांबायचं नाव घेत नाही आहे. गेल्या काही दिवसांपासून देशातील अनेक राज्यांमध्ये मुसळधार पाऊस पडत आहे. यामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून अनेक ठिकाणी पाणी साचल्याच्या घटनाही घडल्या आहेत. सुट्टीचे हक्काचे ठिकाण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गोवालाही पावसाचा तडाखा बसला आहे. दक्षिण गोवामध्ये मुसळधार पावसामुळे मांडवी नदी ओसंडून वाहू लागली आणि येथील पूलही पाण्यात वाहून गेला. यामुळे दूधसागर धबधब्याजवळ जवळपास ४० पर्यटक अडकले होते. दरम्यान राज्य सरकारने तैनात केलेल्या जवानांनी या पर्यटकांची सुटका केली आहे.

ही घटना शुक्रवारी १४ ऑक्टोबरच्या संध्याकाळी घडली. यानंतर एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, ‘मांडवी नदीची पातळी वाढल्यामुळे नदीवरील पूल पाण्यात वाहून गेला. यामुळे जवळपास ४० पर्यटक दूधसागर धबधब्याजवळ अडकले होते.’ पूल नसल्याने हे पर्यटक नदी पार करण्यास असमर्थ होते. तथापि, राज्य सरकारने पाठवलेल्या सुरक्षा जवानांनी या पर्यटकांना सुखरूप बाहेर काढले आहे. दरम्यान, या घटनेनंतर गोवा राज्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी या जवानांचे कौतुक केले आहे. त्यांनी आपल्या ट्वीटमध्ये म्हटलंय, “मुसळधार पावसामुळे नदीतील पाण्याची पातळी वाढून पूल वाहून गेला. यानंतर दूधसागर धबधब्याजवळ अडकलेल्या ४० पर्यटकांना सुरक्षा जवानांनी सुरक्षित बाहेर काढले. पर्यटकांना वाचवल्याबद्दल मी या सुरक्षा रक्षकांची आभार मानतो आणि त्यांचे अभिनंदन करतो.”

महाराष्ट्राच्या काही जिल्ह्यातही पावसाने कहर केला आहे. पुण्यात पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. तर अहमदनगर येथील सीना नदीचे पाणी पुलापर्यंत पोहोचले आहे. दरम्यान, हवामान विभागाने पुण्यासह इतर अनेक राज्यांना अलर्ट जारी केला आहे.

# 'राष्ट्रवादी व्हा'! बघा कोण म्हणतंय?



आपल्याला जे वाट्टेल ते परखडपणे बोलणारी कंगना, कधी कधी भलतंच विधान करुन चर्चेत येणारी कंगना आणि देशाच्या स्वातंत्र्यावर बेताल प्रतिक्रिया देऊन सोशल मीडियावर होणारी कंगना अशी तिची वेगवेगळ्या प्रकारे ओळख सांगता येईल. बॉलीवूडची क्वीन असं ती स्वतालाही म्हणवून घेते. तिच्या चित्रपटांचा मोठा प्रेक्षकवर्ग आहे. कायम आपल्या आक्रमक वक्तव्यांसाठी चर्चेत असणारी कंगना पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. तिनं इंस्टावर शेयर केलेली पोस्ट वेगळ्याच विषयावर भाष्य करते. कंगनानं आता इंस्टावर एक स्टोरी शेयर करुन आपण कोणत्याही आंतरराष्ट्रीय ब्रँडचे गुलाम नसल्याचे म्हटले आहे. भलेही कुणीही काही म्हणो पण मी कुठल्याही ब्रँडला फारसं महत्व देत नाही. असे कंगनानं त्या स्टोरीमध्ये म्हटले आहे. नेहमीप्रमाणे तिला त्यावरुन नेटकऱ्यांनी ट्रोल केले आहे. काहींनी कौतूकाचा वर्षावही केली आहे. गेल्या काही दिवसांपासून कंगना ही तिच्या आगामी इमर्जन्सी या देशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या बायोपिकवरुन चर्चेत आहे. त्याचा टीझर काही दिवसांपूर्वी व्हायरल झाला होता. त्याला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. कंगना आणि तिची आगळी वेगळी फॅशन हा नेहमीच पाहण्याचा आणि चर्चेचा विषय असल्याचे दिसून आले आहे. तिला फोटोग्राफर्सनं एअरपोर्टवर स्पॉट केले तेव्हा त्यावरुन सोशल मीडियावर कमेंटसा वर्षाव सुरु झाला आहे. कंगना म्हणते मी केवळ सहाशे रुपयांची साडी घालून आले आहे. त्याचे कारण मी कोणत्याही आंतरराष्ट्रीय ब्रँडची गुलाम नाही. अर्थात कंगना हे कुणाला उद्देशुन बोलली हे कळायला चाहत्यांना वेळ लागला नाही. ती नेहमीच आपल्या सह अभिनेत्रींना टोमणे मारत असते हे चाहत्यांना कळून चुकले आहे.


# बॉलीवुडची ड्रीम गर्ल गाजवतेय राजकीय मैदान

बॉलीवूडची 'ड्रीम गर्ल' असणा-या हेमा मालिनी यांचा आज जन्मदिवस. आज त्या आपला 74 वा वाढदिवस साजरा करत आहेत. हेमा यांनी आपल्या सौंदर्याने आणि अभिनयाने कायमच प्रेक्षकांना घायाळ केले आहे. वयाच्या 74 व्या वर्षीही त्या अत्यंत देखण्या आणि सतेज दिसतात. त्यांच्या व्यक्तीमत्वातली हीच चमक त्यांनी राजकारणात देखील दाखवली. आज केवळ अभिनेत्री नाही तर खासदार हेमा मालिनी अशी त्यांची ओळख आहे. त्यामुळे अभिनयासोबतच राजकीय मैदान गाजवणाऱ्या या ड्रीम गर्ल प्रवास तिच्या वाढदिवसानिमित्त जाणून घेऊया.. अभिनेत्री हेमा मालिनीचा (HEMA MALINI)अभिनय क्षेत्रातील अनुभव प्रचंड दांडगा आहे. त्यांनी बालवयातच मनोरंजन विश्वात पदार्पण केले. वयाच्या अवघ्या 14व्या वर्षी त्यांनी चित्रपटांमध्ये काम करत आपल्या करिअरची सुरुवात केली होती. 1961मध्ये आलेल्या तेलुगु चित्रपट 'तपंडव वनवासन'मध्ये हेमा मालिनी यांनी एका नर्तिकेची भूमिका साकारली होती. तिथून सुरू झालेला प्रवास ड्रीम गर्ल पर्यंत येणं सोप्पं नव्हतं. पुढे त्यांनी हिंदीमध्ये नशीब आजमावलं. त्यासाठी त्यांनी हिंदी भाषा शिकून घेतली. 1968 मध्ये रिलीज झालेला 'सपनो का सौदागर' हा हेमा मालिनी यांचा पहिला हिंदी चित्रपट होता.



# श्रेयस-प्रार्थनाचा रोमान्स पाहून नवऱ्यानेच केली कमेंट...


'माझी तुझी रेशीमगाठ' ही झी मराठी वाहिनीवरील लोकप्रिय मालिका सध्या बरीच चर्चेत आहे. कारण या मालिकेने निरोप घेता घेता पुन्हा भरारी घेतली. गेल्या काही आठवड्यात नेहा आणि यश यांच्या लव्ह स्टोरी मध्ये रंगत आल्याने प्रेक्षकांची उत्सुकता चांगलीच शिगेला गेली आहे. अशातच यश आणि नेहाचा एक रोमँटिक व्हिडिओ समोर आला आहे. विशेष म्हणजे या रोमँटिक व्हिडिओला तिच्या नवऱ्यानेच कमेंट केली आहे. सध्या प्रार्थना-श्रेयसच्या (PRARTHANA BEHERE) (SHREYAS TALPADE)ऑनस्क्रिन केमिस्ट्रीला प्रेक्षक चांगलीच पसंती देत आहेत. या मालिकेत प्रार्थनाने नेहा तर श्रेयसने यश हे पात्र साकारले आहे. मध्यंतरी यश-नेहाच्या नात्यामध्ये दुरावा आला होता पण आता तो दूर होऊन त्यांच्या नात्याला नवे वळण मिळाले आहे. आगामी भागात यश-नेहामध्ये रोमान्स पाहायला मिळणार आहे. दोघांमध्ये आता जवळीक निर्माण झाली असून त्यांचा एक व्हिडिओ प्रार्थनाने शेअर केला आहे. प्रार्थनाने शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये श्रेयससह ती "और क्या" या सुपरहिट हिंदी गाण्यावर रोमान्स करताना दिसत आहेत. त्यांचा हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहेत. विशेष म्हणजे प्रार्थनाचा नवरा अभिषेक जावकरने तिचा या रोमँटिक व्हिडीओ पाहून कमेंट केली आहे. आपल्या पत्नीचा हा सुंदर व्हिडीओ पाहून अभिषेकने तिला कमेंटच्या माध्यमातून "आय लव्ह यू" असं म्हटलं आहे. तसेच प्रार्थनानेही त्याला प्रतिसाद देत "आय लव्ह यू टू" म्हणत नवऱ्यावर प्रेम व्यक्त केलं. सध्यातरी यश-नेहाचा हा व्हिडीओ प्रेक्षकांच्याही विशेष पसंतीस पडत आहे.



# दिवाळीचा सण येताच अनेकांना आठवण झाली अलार्म काकांची

'उठ उठा दिवाळी आली मोती स्नानाची वेळ झाली' दिवाळी आली की टिव्हीवर हमखास ही जाहीरात दिसते. ही जाहीरात दिसली नाही की, काहीसं सुन सुनं वाटातं. मागील अनेक वर्षांपासून दिवाळी आणी मोती साबण हे समीकरण एकच झालं आहे. शिवाय या मोती साबणासोबतच [illegible] जाहीरातीमधील अलार्म काका देखील घरोघरी पोहोचले. मात्र, यंदाच्या दिवाळीत जरी त्यांची जाहीरात असली तरी अलर्म काका आपल्या सोबत नाहीत. मोती साबणाच्या जाहिरातीतील ज्येष्ठ अभिनेते विद्याधर करमरकर यांचं गेल्या वर्षी 20 सप्टेंबरला निधन झालं.

कोण आहेत विद्याधर करमरकर?



मुंबईमधी विलेपार्लेमधील असणाऱ्या पार्लेश्वर सोसायटीमध्ये ते राहायचे. करमकर यांनी आपली सेंट्रल टेलिग्राफ ऑफिसमधली नोकरी संभाळून अभिनयाची कला जोपासली होती. ते नाटक, छोट्या-मोठ्या जाहीराती आणि चित्रपटांमध्ये कार्तिक कॉलिंग कार्तिक, सास बहू और सेन्सेक्स, गेम विथ अनुपम खेर, दोस्ती यारीयां मनमर्जिया, लंच बॉक्स', 'एक थी डायन, 'एक व्हिलन'यासारख्या चित्रपटांमध्ये त्यांनी आजोबा, बाबा, वडील यांसारख्या भूमिका साकारल्या आहेत. शिवाय फक्त त्यांनी अभिनयच नाही तर अनेक कादंबऱ्या देखील लिहल्या आहेत. हुतात्मा राजगुरू यांचे चरित्रलेखन असलेले समर्पण, क्रंतिरत्न, जाणता अजाणता, पानितपत ही पुस्तकं लिहिली आहेत. यासह त्यांनी नाटक, मालिकांमध्येही त्यांनी लिखाण केले आहे. 'लिनोवो कॉम्प्युटर्स', 'एशियन पेंट' यासारख्या कंपन्यांच्या जाहिरातींतूनही त्यांनी काम केले होते. मात्र सर्वाधीक प्रसिद्ध झाली ती म्हणजे त्यांची मोती साबणाची जाहीरात, सध्या मोती साबण यावर सोशल मीडियावर अनेक मीम व्हायरल होतात.

## शॉर्ट न्यूज »

### भारताचा संदीप दिवे विजेता

। मुंबई । महाईन्यूज

जागतिक अजिंक्यपद कॅरम स्पर्धेत भारताने निर्विवाद वर्चस्व राखले. पुरुष, महिला एकेरीसह दुहेरी आणि दोन्ही विभागांत भारताने सांघिक विजेतेपदही मिळविले. एकेरीत संदीप दिवे आणि रश्मी कुमारी विजेते ठरले. मलेशियात झालेल्या या स्पर्धेत एकेरीच्या अंतिम लढतीत जागतिक स्पर्धेत प्रथमच खेळणाऱ्या संदीप दिवेने भारताच्याच अब्दुल रेहमानचा १-२५, २५-१९, २५-२२ असा पराभव केला. तिसऱ्या क्रमांकच्या लढतीत भारताच्या श्रीनिवासने प्रशांत मोरेला २५-१२, २५-२० असे नमवले. महिला एकेरीच्या अंतिम लढतीत रश्मी कुमारीने भारताच्याच राष्ट्रीय विजेत्या महाराष्ट्राच्या काजल कुमारीला २५-२०, २५-१६ असे पराभूत केले. रश्मीचे हे तिसरे विजेतेपद ठरले. महाराष्ट्राच्या नीलम घोडकेने कांस्यपदक मिळविताना देबजानी तामूलीचा २५-२१, २५-७ असा पराभव केला. पुरुष सांघिक गटात भारताने श्रीलंकेचा आणि महिला विभागात अमेरिकेचा ३-० अशा फरकाने पराभव केला.

# अटीतटीच्या सामन्यात शेवटच्या षटकात नेदरलँडचा थरारक विजय

## यूएईचा तीन गडी राखून पराभव

अहमदाबाद । महाईन्यूज । वृत्तसंस्था

ऑस्ट्रेलियात आजपासून सुरु झालेल्या टी२० विश्वचषकातील पात्रता फेरीतील दुसऱ्या सामन्यात नेदरलँडने यूएईवर रोमांचक विजय मिळवला. हा सामना नेदरलँड्स संघाने ३ गडी राखून आपल्या खिशात घातला आणि विश्वचषकात विजयी सुरुवात केली. रविवारी (१६ ऑक्टोबर) जिलॉन्ग येथे झालेल्या सामन्यात यूएईने नेदरलँड्ससमोर ११२ धावांचे लक्ष्य ठेवले होते. प्रत्युत्तरात नेदरलँड्सने २० व्या षटकात लक्ष्य गाठले.



नेदरलँड्सकडून फलंदाजी करताना मॅक्स ओडोड याने सर्वाधिक धावा चोपल्या. त्याने १८ चेंडूंचा सामना करताना २३ धावा केल्या. या धावा करताना त्याने १ षटकार आणि ३ चौकार मारले. त्याच्याव्यतिरिक्त कॉलिन ऍकरमन याने १७ धावा, स्कॉट एडवर्ड्स १६ धावांवर नाबाद राहिला, टीम प्रिंगलने आणि बॅस डी लीड्स याने अनुक्रमे १५ आणि १४ धावा केल्या. इतर एकाही फलंदाजाला दोन आकडी धावसंख्या करता आली नाही. मात्र, तरीही संघाने शानदार विजय मिळवला. तत्पूर्वी, यूएईच्या कर्णधाराने येथे नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. यूएईने संथ पण दमदार सुरुवात केली. सलामीवीर चिराग सुरी २० चेंडूत १२ धावा करून वॅन डर मर्वेचा बळी ठरला. ३३ धावांवर पहिली विकेट पडल्यानंतर सलामीवीर मोहम्मद वसीम (४१) सोबत काशिफ दाऊद (१५) यांनी डाव पुढे नेला. यानंतर वृत्त अरविंदनेही २१ चेंडूत १८ धावांची खेळी केली. या चार फलंदाजांनी दुहेरी आकडा गाठला पण सर्वांनी केलेल्या धावांपेक्षा जास्त चेंडू खेळले. याचा परिणाम असा झाला की संघाचा धावगती सर्वकाळ ६ च्या वर जाऊ शकला नाही.

इतर फलंदाज काही धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतले. जवर फरीद (२), बासील हमीद (४), कॅप्टन रिझवान (१) आणि अयान अफजल खान (५) विशेष काही दाखवू शकले नाहीत. यूएईचा संपूर्ण संघ निर्धारित २० षटकात ८ गडी गमावून केवळ १११ धावाच करू शकला.

# आशियाई युवा ॲथलेटिक्स स्पर्धा : पालघरच्या ईशाला रौप्य, साताराच्या अनुष्काला कांस्य

। मुंबई । महाईन्यूज । वृत्तसंस्था



महाराष्ट्राच्या दोन युवतींनी कुवेत येथे सुरू असलेल्या आशियाई युवा ॲथलेटिक्स स्पर्धेत भारताला पदके मिळवून दिली. मुलींच्या ४०० मीटर धावण्याच्या शर्यतीत पालघर जिल्ह्यातील ईशा जाधवने रौप्य, तर सातारा जिल्ह्यातील अनुष्का कुंभारने कांस्यपदक पटकावले. राष्ट्रीय युवा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणाऱ्या १६ वर्षीय ईशाने ५६.१६ सेकंद अशी वेळ देताना रौप्यपदक आपल्या नावे केले. पंधरा दिवसांपूर्वी आपला सोळावा वाढदिवस साजरा करणाऱ्या ईशाची ही पहिलीच आंतरराष्ट्रीय स्पर्धा होती. ईशा अमेय क्लासिक क्लब येथे संदीप लटवाल यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करते.

कऱ्हाड (जि. सातारा) येथे माजी राज्य क्रीडा मार्गदर्शक बळवंत बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करणाऱ्या अनुष्काने ५७.३६ सेकंद अशी वेळ देताना कांस्यपदक जिंकले. तिने जुलै महिन्यात कोलंबिया येथे झालेल्या जागतिक कुमारी स्पर्धेतही भाग घेतला होता. स्पर्धेच्या पहिल्या दिवशी आकाश यादवने १९.३७ मीटरवर गोळा फेकून भारताला पहिले सुवर्णपदक मिळवून दिले. यात भारताच्या सिद्धार्थ चौधरीने कांस्यपदकाची कमाई केली. सिद्धार्थने १९ मीटर अंतरावर गोळा भिरकावला. मुलांच्या १५०० मीटर शर्यतीत अमित चौधरीने ४ मिनिटे व ४.५९ सेकंद वेळ देत भारताला दुसरे सुवर्णपदक मिळवून दिले. मुलींच्या थाळीफेकीत निकिता कुमारीला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले. निकिताने ४४.१४ मीटर अंतरावर फेक केली. राष्ट्रीय स्पर्धेत लक्षद्वीपसाठी पदक जिंकणारी पहिली खेळाडू ठरलेल्या मुबस्सिना मोहमने लांब उडीत ५.९१ मीटर अंतरावर उडी मारताना पहिले आंतरराष्ट्रीय पदक जिंकण्याची किमया केली.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजिटल आवृत्ती छपाईसाठी नाही